

अखिल भारतीय मराठा महासंघ
केंद्र व महाराष्ट्र आरक्षण
प्रमुख सवलती
महामंडळ
संस्था
शिष्यवृत्ती
योजना
न्यायालयीन लढा
माहिती पुस्तिका
संकलन | संपादन | लढा | न्यायालयीन लढा
राजेंद्र कोंढरे
अध्यक्ष, अखिल भारतीय मराठा महासंघ

# महाराष्ट्र राज्य-शिक्षण व नोकरीमधील आरक्षणातील प्रवर्ग निहाय टक्केवारी





| | |
|---|---|
| अनुसूचित जाती (SC) | १३% |
| अनुसूचित जमाती (ST) | ७% |
| विमुक्त जाती (VJA) | ३% |
| भटक्या जमाती ब (NTB) | २.५% |
| भटक्या जमाती क (NTC) | ३.५% |
| भटक्या जमाती ड (NTD) | २% |
| विमाप्र (SBC) | २% |
| इतर मागास प्रवर्ग (OBC) | १९% |
| आर्थिक दुर्बल घटक (EWS) | १०% |
| सा. व शै. मागास प्रवर्ग (SEBC मराठा) | १०% |
| खुला प्रवर्ग (General) | २८% |

www.marathamahasangh.org


# केंद्रीय आरक्षण - शिक्षण व नोकरीमधील प्रवर्ग निहाय आरक्षणाची टक्केवारी

| | |
|---|---|
| अनुसूचित जाती (SC) | १५% |
| अनुसूचित जमाती (ST) | ७.५% |
| **इतर मागास प्रवर्ग (OBC)**<br>VJA, NTB, NTC, NTD, SBC<br>या सर्व जाती केंद्रीय OBC यादीत<br>एकत्रित समाविष्ट आहेत. | २७% |
| आर्थिक दुर्बल घटक (EWS) | १०% |
| खुला प्रवर्ग (General) | ४०.५% |

- SEBC मराठा केंद्रीय यादीत EWS मध्ये आहे.
- कुणबी प्रमाणपत्र धारक OBC मध्ये आहे.




www.marathamahasangh.org




# केंद्रीय २७% OBC आरक्षणाचे ३ विभागात उपवर्गीकरण प्रस्तावित

- केंद्राच्या OBC यादीत (महाराष्ट्र) २६१ प्रमुख जाती + तत्सम मिळून एकुण ३२१.
- न्या. रोहिणी आयोगाला SEBC (OBC) २७% आरक्षणाचे तीन उपवर्गात वर्गीकरण करण्याचे निर्देश देण्यात आले होते.
- त्यानुसार केंद्रीय २७% OBC मागास प्रवर्गातील काही जात व वर्ग समूहांनी आरक्षणाचा जास्त लाभ घेतला आहे. तसेच काहींना तो पुरेसा मिळालेला नाही.
- अशा जात व वर्ग समुहाचे ३ किंवा ४ उपवर्गात वर्गीकरण करावे. ज्यांना आरक्षणाचा लाभ कमी मिळाला त्यांना तो पुरेश्या प्रमाणात मिळावा.
- यासाठीची शिफारस असलेला न्या. रोहिणी आयोगाचा अहवाल मा. राष्ट्रपतीकडे मंजुरीला गेलेला आहे. भविष्यात तो मंजूर झाल्यास OBC आरक्षणाचे ३ किंवा ४ उपवर्गात वर्गीकरण होऊन त्यातील एका गटात कुणबीचा समावेश राहील.
- मराठा आहे ते केंद्रीय यादीत EWS प्रवर्गात १०% आरक्षणात समाविष्ट आहेत .

# महाराष्ट्र राज्य आरक्षण प्रवर्ग निहाय जातींची संख्या


| प्रवर्गाचे नाव | प्रमुख जाती | तत्सम जाती | एकूण जाती |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती (SC) | ५९ + | ९५ | १५४ |
| अनुसूचित जमाती (ST) | ४५ + | १३९ | १८४ |
| विमुक्त जाती (VJA) | १४ + | ४७ | ६१ |
| भटक्या जमाती ब (NTB) | ३६ + | १५२ | १८८ |
| भटक्या जमाती क (NTC) | १ + | २६ | २७ |
| भटक्या जमाती ड (NTD) | १ + | २ | ३ |
| विमाप्र (SBC) | ६ + | ४४ | ५० |
| इतर मागास प्रवर्ग (OBC) | २८७ + | २२६ | ५१३ |
| आर्थिक दुर्बल घटक (EWS) | ८६ + | माहित नाही | ८६ |
| सा. व शै. मागास प्रवर्ग (SEBC मराठा) | १ + | - | १ |
| खुला प्रवर्ग (General) | | - | १२६७ |

*उपलब्ध डाटा व सोर्सच्या आधारे




चार्ट मध्ये जातींची संख्या SEBC १ व NTD ३ असल्याने दिसत नाही.

www.marathamahasangh.org




केंद्राच्या महाराष्ट्र OBC यादीत असलेल्या सर्व जाती राज्याच्या OBC यादीत तशाच असतील असे नाही. राज्याच्या OBC यादीतील सर्व जाती केंद्राच्या OBC यादीत तशाच असतील असेही नाही. दोन्ही याद्या स्वतंत्र आहेत.

## केंद्रीय आरक्षण-प्रवर्ग निहाय जातींची संख्या

| | |
|---|---|
| अनुसूचित जाती (SC) | ५९ + तत्सम |
| अनुसूचित जमाती (ST) | ४७ + तत्सम |
| **इतर मागास प्रवर्ग (OBC)** VJA, NTB, NTC, NTD, SBC या सर्व जाती केंद्रीय OBC यादीत एकत्रित समाविष्ट आहेत. | २५६ + तत्सम |
| आर्थिक दुर्बल घटक (EWS) | संकलन नाही |
| खुला प्रवर्ग (General) | संकलन नाही |

# व्यावसयिक शिक्षण, नोकरीच्या आरक्षणासाठी प्रवर्ग निहाय उत्पन्न मर्यादा

- अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गाला उत्पन्न मर्यादा लागू नाही.

- VJA, NTB, NTC, NTD, SBC, SEBC (मराठा), OBC, EWS या सर्व प्रवर्गांना रूपये ८ लाख वार्षिक उत्पन्नाची कुटुंबासाठीच मर्यादा आहे.

- केंद्र व राज्य सरकारच्या धोरणानुसार केंद्र व राज्य सरकारमधील वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचाऱ्याना नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्राच्या करिता त्यांचे नोकरी व शेतीमधील कुटुंबाचे उत्पन्न हे मूळ उत्पन्नात धरले जात नाही. त्यामुळे ते उत्पन्न सोडून जर इतर उत्पन्न ८ लाखाच्या वर नसेल तर त्यांना आरक्षणाचा लाभ घेता येतो .




नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र लागू केले असले तरी वर्ग ३ व वर्ग ४ चे सरकारी कर्मचारी सोडून उर्वरित सर्वांना रुपये ८ लाख उत्पन्नाची मर्यादा लागू आहे






www.marathamahasangh.org

## महाराष्ट्र नोकरीतील आरक्षणासाठी वयोमर्यादा




- SC, ST, VJA, NTB, NTC, NTD, SBC, SEBC (मराठा), OBC, EWS यांच्यासाठी वयोमर्यादा **४३** आहे.
- खुल्या प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी मागास व बिगर मागास प्रवर्गासाठी वयोमर्यादा **३८** आहे.

## केंद्रीय नोकरीतील आरक्षणासाठी वयोमर्यादा




- SC, ST, OBC, (VJA, NTB, NTC, NTD, OBC), EWS यांच्यासाठी वयोमर्यादा **३५** आहे.
- खुल्या प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी मागास व बिगर मागास प्रवर्गासाठी वयोमर्यादा **३२** आहे.



www.marathamahasangh.org

# महाराष्ट्रात व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक शिष्यवृत्ती / प्रतिपूर्ती योजना

- अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) १००% माफी.
- विजाभज व विमाप्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती उत्पन्न मर्यादा ८ लाख (विद्यार्थ्यांना १००% पर्यंत प्रतिपूर्ती)
- OBC विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती उत्पन्न मर्यादा ८ लाख (शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती ५०%)
- ८ लाख उत्पनाच्या आतील विद्यार्थीनींकरिता १००% फी माफ
- मराठा SEBC व EWS विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू शैक्षणिक प्रतिपूर्ती उत्पन्न मर्यादा ८ लाख ( शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क विद्यार्थ्यांना ५०% प्रतिपूर्ती व विद्यार्थीनीकरिता १००% फी माफ )
- खुला प्रवर्ग विद्यार्थ्यांना ८ लाख उत्पन्न मर्यादा, ५०% पर्यंत प्रतिपूर्ती, विद्यार्थीनींकरिता १००% फी माफ.
- अभिमत विद्यापीठ Deem University मध्ये राजश्री शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू.



**सुमारे ९०० अभ्यासक्रमांसाठी योजना लागू**

https://mahadbt.maharashtra.gov.in

www.marathamahasangh.org



# विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक अभ्यासक्रम निर्वाह भत्ता

- अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) **स्वयंम् आधार योजना.**

- VJA, NTB, NTC, NTD, SBC, OBC यांच्यासाठी **ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना** तालुक्याच्या ठिकाणी वार्षिक रु. ३८०००/- इतर जिल्ह्याच्या ठिकाणी रु. ४३०००/- महसुली विभागीय जिल्हे रु. ५१०००/- मुंबई, पुणे इ. महानगरे रु. ६००००/-

- मराठा व EWS यांच्यासाठी **डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता -** तालुक्याच्या ठिकाणी वार्षिक रु. ३८०००/- इतर जिल्ह्याच्या ठिकाणी रु. ४३०००/- महसुली विभागीय जिल्हे रु. ५१०००/- मुंबई, पुणे इ. महानगरे रु. ६००००/-

- ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळत नाही अशांसाठी ही योजना आहे.





www.marathamahasangh.org

https://mahadbt.maharashtra.gov.in

सारथी
sarthi-maharashtragov.in

महाज्योती
— ज्ञानदीप समतेचा —
https://mahajyoti.org.in

# सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, उन्नतीसाठी, प्रवर्ग निहाय राज्य सरकारच्या संस्था

अखिल भारतीय मराठा महासंघ

- अनुसूचित जाती (SC) : **BARTI (1978), AARTI**
- अनुसूचित जमाती (ST) : **TRTI (1962)**
- OBC, VJNT, SBC यांच्यासाठी **महाज्योती (२०१९) व इतर नवीन संस्था**
  **प्रस्तावित** मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी यांच्यासाठी **सारथी संस्था (२०१८)**
- आर्थिक दुर्बल घटक : **अमृत संस्था (२०१९)**




www.marathamahasangh.org

# उद्योजकतेसाठी आर्थिक विकास महामंडळे

- **अनुसूचित जाती (SC) :** म. फुले मागासवर्ग विकास महामंडळ, संत रोहिदास महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ
- **अनुसूचित जमाती (ST) :** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, आदिवासी विकास महामंडळ
- **इतर मागास प्रवर्ग (OBC), VJA, NTB, NTC, NTD, SBC :** वसंतराव नाईक विजाभज विकास महामंडळ
  महा. राज्य इतर मागास विकास महामंडळ (कुणबी प्रमाणपत्र धारकांना या महामंडळाकडून लाभ घ्यावा लागेल.)
  श्यामराव पेजे कोकण इतर मागास वर्ग महामंडळ, महात्मा बसवेश्वर महामंडळ, संत काशिबा गुरव महामंडळ
  काही नवीन प्रस्तावित
- **आर्थिक दुर्बल घटक, SEBC (मराठा) :** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळ ज्याची नोंद मराठा आहे, त्यांना या महामंडळाकडून लाभ मिळतो.
- **ब्राह्मण समाजासाठी :** परशुराम आर्थिक विकास महामंडळ

udyog.mahaswayam.gov.in

www.marathamahasangh.org



# राजकीय आरक्षण


**SC, ST करिता लोकसभा, विधानसभा,**
**स्थानिक स्वराज्य संस्था**
**मतदार संघ राखीव**
**घटना अनुच्छेद ३३०, ३३२, ३३४**

**VJA, NTB, NTC, NTD, SBC,**
**इतर मागास प्रवर्ग (OBC)**
**स्थानिक स्वराज्य संस्था**
**मतदार संघ राखीव**
**घटना अनुच्छेद २४३ डी, २४३ टी**

**आर्थिक दुर्बल घटक EWS, SEBC (मराठा)**
**राजकीय आरक्षण लागू नाही**

www.marathamahasangh.org

# कुणबी प्रमाणपत्र धारकांना सध्याचा उपलब्ध पर्याय


Form B-2 (Amended)
RULE 5(5)(4)(IV)
Form of Caste Certificate to be issued Other Backward Classes, Vimukta Jati (A) Nomadic Tribes (B,C & D), Special Backward Class, Educationally and Socially Backward Class and Special Backward Class (A) and its synonyms belong to State of Maharashtra

Documents Verified
1 Caste Certificate issued by the Local Competent Authority
2 School Leaving Certificate
3 Income Certificate for the last 3 years issued by the Tahsildar
4 Copy of Ration Card
5 Self Declaration

CASTE CERTIFICATE (PART-A)

This is to certify that Shri Nilesh Krushna Gole Son of Shri Krushna Gole of village Kawadas, taluka Shahapur, district Thane of the State of Maharashtra belongs to the Kunbi ( 83 ) caste which is recognized as Other Backward Class under the Government Resolution No CBC-1467/M dated 13/10/1967 as amended from time to time.

Shri Nilesh Krushna Gole and/or his family ordinarily reside(s) in village Kawadas, taluka Shahapur, district Thane of the State of Maharashtra.

NON-CREAMY LAYER CERTIFICATE (PART-B)

This is to certify that Shri Nilesh Krushna Gole does not belong to the persons/sections (Creamy-layer) mentioned in the Government of Maharashtra Gazette, Part IV-B, dated 29th January 2004, Maharashtra State Public Service Commission (Reservation for S.C./S.T./D.T.(V.J.)N.T., S.B.C. & O.B.C. Act, 2001 and instructions and guidelines laid down in the Government Resolution, Social Justice, Cultural Affairs, Sports and Special Assistance Department No. CBC-10/2001/Pra.Kra.120/Mavak-5, dated 1st November 2001, CBC-1094/Pra.Kra.86/Mavak-5, dated 16th June, 1994, CBC-1094/Pra.Kra.86/Mavak-5, dated 5th June, 1997 and Government Resolution No.CBC- 10/2001/Pra.Kra.111/Mavak-5, dated 29th May 2003 and Government Resolution No. VJNT-2014/C.R.118/VJNT-1, dated 31st July 2014 and Government Resolution No.CBC-10/2008/Pra.Kra.697/VJNT-1,Dated 16 Dec 2017.

This Certificate is valid for the period upto 31-Mar- 2023 from the date of issue.

Signature valid

Place : Shahapur
Date : 16/08/2020
(With the seal of Office)

Printed By -OMTID : VLE Name :VIJAY VITTHAL MOGARE, Date:16/08/2020 12:47PM

- **१९% इतर मागास प्रवर्ग आरक्षण (घटना अनुच्छेद १५ (४) व १६ (४) नुसार)**
- राज्यातील OBC साठी असलेल्या १९% आरक्षणामध्ये ५१३ मुख्य व तत्सम जातीचा समावेश आहे.
- याच प्रवर्गात कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी प्रमाणपत्र धारकांचा समावेश होतो. त्यांना OBC मधील ५१३ जातीतील उमेदवाराशी स्पर्धा करून गुणवत्तेवर नोकरी किंवा शिक्षणातील आरक्षित जागा मिळवावी लागते. कुणबी प्रमाणपत्र राज्यात सन १९६७ पासून मिळते. मराठवाड्यात ते अत्यल्प प्रमाणात मिळत असल्याने आता ती देण्यास सुरुवात झाली आहे.
- **जात प्रमाणपत्र देण्याच्या नियमात दि.२४ नोव्हेंबर २०१७, दि. ३ एप्रिल २०१८ रोजी केलेल्या दुरुस्त्यांच्या २ अधिसुचना व दि. २८.२.२०१८ चे परिपत्रक.** सन २०२४ मध्ये **न्या. संदिप शिंदे समिती नेमून** जात प्रमाणपत्र देण्यात सुसूत्रता व सुटसुटीत पद्धत अवलंबण्याचा महायुती सरकारचा निर्णय व त्या आधारे असंख्य पात्र व्यक्तींना नोंद असलेल्या कुणबी जात प्रमाणपत्रे प्रदान. **जात प्रमाणपत्रासाठी ४८ पुरावे ग्राह्य धरणार. या दुरुस्त्यांचा इतर समाजाला देखील फायदा.**
- मराठवाड्यात गेल्या **३७ वर्षात २,३६३ कुणबी प्रमाणपत्र दिली गेली होती. सदरचे प्रमाणपत्र मिळण्यात असलेले अडथळे दूर झाल्याने गेली १० महिन्यात मागच्या पेक्षा ७० पट जास्त पात्र व्यक्तींना १,६६,६१३ कुणबी, मराठा-कुणबी प्रमाणपत्र दिली. त्यावरून सर्व तहसील कार्यालयातील रेकॉर्ड संगणकीकृत करून वेबसाईट वर टाकलेले आहे.** पात्र व्यक्तींना कुणबी, कुणबी-मराठा नोंदीच्या आधारे यापुढे जात प्रमाणपत्र मिळतील. सरसकट सर्वच मराठ्यांचे कुणबी करण करण्यास काही तांत्रिक आणि न्यायालयीन अडथळे आहेत.

**सामाजिक न्याय विभाग अधिसूचना** सीबीसी १०/२०१७/प्र.क्र. ५०/मावक २४/११/२०१७ व सीबीसी १०/प्र.क्र. २१९/मावक २८/२/२०१८ आणि सीबीसी २०२३/प्र.क्र. १८२/मावक २७/१२/२०२३ व १८/७/२०२४

# मराठा नोंद असलेल्यांना उपलब्ध पर्याय

- Socially and Educationally Backward Classes (SEBC)
  सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग

- **10% SEBC मराठा आरक्षण (राज्य घटना अनुच्छेद १५(४) ब १६(४) नुसार)**

- महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या शिफारशी नुसार राज्य विधीमंडळाने एकमताने SBBC कायदा २०२४ पारित करून मराठा समाजाला शिक्षण व नोकरीमध्ये १०% आरक्षण देण्यासाठी सन २०२४ चा अधिनियम क्र. १६ दि. २६.२.२०२४ व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय २७.२.२०२४ रोजी प्रसिद्ध झाला आहे.

- SC, ST, VJA, NTB, NTC, NTD, SBC, SEBC हे मागास प्रवर्ग राखीव प्रवर्गात मोडतात त्यामुळे त्यांना EWS आरक्षणाचा लाभ घेता येत नाही.

- **मात्र मराठा समाज केंद्रात खुल्या प्रवर्गात असल्याने केंद्रातील EWS आरक्षणाचा लाभ घेता येतो.**



www.marathamahasangh.org

# आर्थिक दुर्बल घटक (EWS)

- **१०% Economically Backward Classes (EWS) आरक्षण (घटना अनुच्छेद १५ (६) व १६ (६) नुसार)**

- **संसदेने १०३ वी घटना दुरुस्तीने लागू केलेल्या EWS आरक्षणामुळे देशातील सर्व जात, धर्म, पंथ आरक्षणाच्या  कक्षेत आल्याने एकही जात धर्म आरक्षणाच्या बाहेर नाही.**

- SC, ST, VJA, NTB, NTC, NTD, SBC, SEBC हे घटक मागास प्रवर्गात आहेत. ते वगळून उर्वरित जवळपास अंदाजे ८६ च्या पुढे बिगर मागास ब्राम्हण प्रभू इ. जाती व जैन, मुस्लिम (मुस्लिम मधील  बिगर मागास ), शीख, पारशी, सिंधी इ. घटकासाठी आर्थिक दुर्बल घटक (उत्पन्न मर्यादा ८ लाख) यांच्यासाठी हे आरक्षण आहे.

- EWS साठी सामाजिक मागासलेपणाची आवश्यकता नसून फक्त आर्थिक मागास  असणे आवश्यक आहे. या EWS प्रवर्गात  आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी गुणवत्तेवर स्पर्धा करून नोकरी किंवा शिक्षणातील आरक्षित जागा मिळवावी  लागेल.

- **SEBC (मराठा) आरक्षण लागू होण्यापूर्वी यात पूर्वी मराठा समाजाचा समावेश होता. आता फक्त केंद्रीय आरक्षणासाठी मराठा समाजाला EWS आरक्षणाचा लाभ घेता येईल.**


www.marathamahasangh.org



# खुला प्रवर्ग (GENERAL)

- **२८% खुला प्रवर्ग**
- या खुल्या प्रवर्गात सर्व उत्पन्न गटातील, SC, ST, VJA, NTB, NTC, NTD, SBC, SEBC, OBC, EWS सह सर्व जाती धर्माचा समावेश होतो.
- शैक्षणिक प्रवेश व नोकरी भरतीमध्ये खुल्या प्रवर्गात लागू असलेल्या वयोमर्यादा व इतर अटी पूर्ण करणाऱ्या सर्व राखीव प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गात स्पर्धा करता येते.
- आरक्षित प्रवर्गा प्रमाणे मराठा व कुणबी आरक्षण पात्र उमेदवारांना देखील या खुल्या प्रवर्गात स्पर्धा करता येते.


**आरक्षण - मराठा व कुणबी समाजासमोर सध्याचे उपलब्ध पर्याय.**




www.marathamahasangh.org

# सर्वप्रकारच्या आरक्षणांना विविध न्यायालयामध्ये आव्हान

- महाराष्ट्र  आरक्षण अधिनियम २००४ (५२% आरक्षणाचा मूळ कायदा) सदरचा कायदा महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (MAT) ने २८.११.२०१४ रोजी रद्द केला. त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने आरक्षण कायद्याची वैधता नंतर  पाहू, परंतु ४.८.२०१७ रोजी पदोन्नती Madhil आरक्षण रद्द kele. (WP ८४५२/२००४, WP २७९७/२०१५) सदरचा कायदा व पदोन्नत्ती मधील आरक्षण सर्वोच्च न्यायालयात (SLP २८३०६/२०१७) आव्हानीत आहेत. याची अंतिम सुनावणी होने बाकी आहे.
- कुणबी प्रमाणपत्र बाबत PIL ११/२०२४ मुबई उच्च न्यायालयात आव्हानीत आहे.
- SEBC (मराठा) आरक्षण अधिनियम २०२४ मुबई उच्च न्यायालयात WP ३४६८/२०२४ व PIL ३९/२०२४ आव्हानीत आहे.
- राज्यातील एकूणच ओबीसी आरक्षण व २३ मार्च १९९४ चा शासन निर्णय PIL ३६/२०२४ व PIL १४०/२०२२  मुंबई उच्च न्यायालयात आव्हानीत आहे.
- मराठा आरक्षण विरोधी याचिका क्रमांक PIL ३४६८/२०२४ मध्ये अखिल भारतीय मराठा महासंघाचे वतीने जेष्ठ विधीज्ञ यांचे मार्फत बाजू मांडणार
- **आपल्या देशात व राज्यात सर्व जाती आणि धर्म यांना शिक्षण व शासकीय नोकरीत आरक्षण आहे. त्यांच्या अंमलबजावणीत सर्व घटकातील तळागाळापर्यंत अपेक्षित परिणाम साध्य होताना अडचणी आहेत.**
- पदोन्नती  आरक्षण SEBC आरक्षण कुणबी आरक्षण यामध्ये अखिल भारतीय मराठा महासंघाने न्यायालयात व प्रशासनात बाजू मांडली आहे. PIL १४०/२०२२, WP ८४५२/२००४  व इतर .
- या विषयावरील व्हिडीओ व अधिक माहिती www.marathamahasangh.org या वेबसाईट वर वेळोवेळी पहायला मिळेल तसेच आपल्या काही सूचना माहिती असल्यास marathamahasangh1981@gmail.com या मेलवर पाठवा ही विनंती.



# बढती आरक्षणाचा लढा


- अखिल भारतीय मराठा महासंघाचा पदोन्नती आरक्षणाचा लढा - वर्षानुवर्षे बढतीच्या प्रतिक्षेत अडकलेल्या सरकारी अधिकारी कर्मचाऱ्यांचा मार्ग मोकळा
- २३ मार्च १९९४ च्या शासन निर्णयाचे रुपांतर राज्याच्या आरक्षण कायद्यात सन २००४ झाले. या कायद्यातील घटनाबाह्य पदोन्नती व अन्यायकारक तरतुदी विरुध्द अखिल भारतीय मराठा महासंघाने सन २००४ मध्ये आंदोलने केली.
- पदोन्नती मधील अन्यायकारक तरतुदी विरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात श्री विजय घोगरे, हनुमंत गुणाले, हेमंत धुमाळ, इ. नी WP ८४५२/२००४ ही पिटीशन दाखल केली.
- या केसमध्ये राजेंद्र कोंढरे यांनी अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने बाजू मांडली. काही काळ २५/५/२००४ बढतीच्या शासन निर्णयास स्थगिती मिळाली.
- आपण ज्या ओबीसी प्रवर्गात समावेशाची मागणी करतो तो राज्याचा मूळ आरक्षण कायदा २००४ हा घटनाबाह्य असून MAT ने दि. २८.११.२०१४ रोजी रद्द केला होता.
- त्यानंतर राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयात अपील केले. त्यात उच्च न्यायालयाने राज्याच्या आरक्षण कायद्याची वैधता नंतर तपासू. मात्र बढती मधील आरक्षण WP २७९७/२०१५ या केसमध्ये दि ४/८/२०१७ रोजी रद्द केले.
- त्यावर महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयात SLP २८३०६/२०१७ अपील केले. सध्या ही केस सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.
- मुंबई उच्च न्यायालयाच्या बढती रद्द करण्याच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली नाही. त्यानंतर वर्षानुवर्षे बढतीच्या प्रतिक्षेत असलेल्या सर्व जाती प्रवर्गातील व खुल्या प्रवर्गातील हजारो कर्मचारी अधिकारी यांना सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती मिळत आहे.

www.marathamahasangh.org

# जात प्रमाणपत्र देण्याच्या नियमात सुधारणा

- **कुणबी प्रमाणपत्र -** उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने न्या. मार्लापल्ले यांनी कुणबी प्रमाणपत्र बाबत दिलेल्या निकालामुळे राज्यातील कुणबी प्रमाणपत्र देणे बंद झाले होते. सदरचे प्रमाणपत्र देण्यास तसेच त्यातील अडथळे व आक्षेप दूर करून प्रसंगी न्यायालयीन प्रक्रियेत सहभागी होऊन कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी गेल्या अनेक वर्षात मराठा महासंघाने प्रयत्न केले व ते यशस्वी झाले.

- जात प्रमाणपत्र देण्याचा सन २०१२ च्या नियमात , दि.२४ नोव्हेंबर २०१७, दि. ३ एप्रिल २०१८ च्या केलेल्या दुरुस्त्यांच्या २ अधिसुचना व दि. २८.२.२०१८ चे परिपत्रक यामुळे जात प्रमाणपत्रासाठी ११ पुरावे ग्राह्य, रक्त नाते संबंधात जातवैधता असल्यास अधिकचे पुरावे न मागता जात प्रमाणपत्र देणे, कु, कुण, यांना कुणबी प्रमाणपत्र देणेबाबत केलेल्या सुधारणासाठी अखिल भारतीय मराठा महासंघ यांनी शासनाकडे व बार्टी पुणे यांचेकडे पाठपुरावा केला. तो अमलात येऊन सर्व जातीतील लाखो लोकांना व कुणबी प्रमाणपत्र धारकांना त्याचा उपयोग झाला.



परिशिष्ट – अ

Form of Certificate to be issued to Socially and Educationally Backward Class persons belonging the State of Maharashtra.

Documents Verified
1 Copy of School Leaving Certificate Of beneficiary
2 Caste Certificate issued by the Local Competent Authority
3 Income Certificate for the last 3 years issued by the Tahsildar
4 Photo ID of Applicant
5 Copy of Ration Card & Electoral Photo ID

Outward No : 41053062038

SDO/Dy.Col./SEBC Reg./Case No

CASTE CERTIFICATE (PART-A)

This is to certify that **Kumar Someshwar Keshavrao Pawale Son** of **Mr. Keshavrao** of village **Marwali**, taluka **Naigaon (Khairgaon)**, district **Nanded** of the State of Maharashtra belongs to the **Maratha** Caste under the Government Resolution Social Justice & Special Assistance Department No. **CBC-10/2013/C.R.35/MVK** dated **15/07/2014** as amended from time to time as a Socially and Educationally Backward Class.

**Kumar Someshwar Keshavrao Pawale** and/or his family ordinarily reside(s) in village **Marwali**, taluka **Naigaon (Khairgaon)**, district **Nanded** of the State of Maharashtra.

NON-CREAMY LAYER CERTIFICATE (PART-B)

This is to certify that **Kumar Someshwar Keshavrao Pawale** Does not belong to the persons/sections (Creamy-layer ) mentioned in the Government of Maharashtra Gazette, Extra-Ordinary, Part VIII, dated 30th November, 2018, Maharashtra State Reservation (of seats for admission in educational institutions in the State and for appointments in the public services and posts under the State) for Socially and Educationally Backward Classes (SEBC) Act,2018 and instructions and guidelines laid down in the Government Resolution Social Justice, Cultural Affairs, Sports and Special Assistance Department No. CBC-10/2001/Pra.Kra.120/Mavak-5, dated 1st November, 2001, CBC-1094/Pra.Kra.86/Mavak-5 , dated 16th June, 1994, CBC-1094/Pra.Kra.86/Mavak-5 , dated 5th June, 1997 and Government Resolution No. CBC-10/2001/Pra.Kra.111/Mavak-5, dated 29th May, 2003 and Government Resolution No. VJNT–2014/C.R.118/VJNT-1, dated 31st July, 2014.

This Certificate is valid for the period upto 31-Mar- 2020 from the date of issue.

Signature valid
Digitally Signed by Amolsingh Ankush Bhosle
-2019 5:41:02 PM
**Sub Divisional Officer**
**Biloli**

Place : **Biloli**
Date : **19/07/2019**
(With the seal of Office)

Printed By -OMTID : VLE Name :Bajrao Digambar Dhage, Date:19/07/2019 4:23PM

This is a digitally signed document, hence is legally valid as per the Information Technology(IT) Act, 2000.
To verify visit https://www.mahaonline.gov.in/Verify OR SMS "MH<space>CSC<space>VRFY<20 digit Barcode number>" to 166 from a BSNL, MTNL, Tata Mobile and 51969 from others.


- मराठवाड्यात झालेल्या २०२३-२०२४ मध्ये झालेल्या आंदोलनामुळे सन २०२४ मध्ये न्या. संदिप शिंदे समिती नेमून जात प्रमाणपत्र देण्यात सुसूत्रता व सुटसुटीत पद्धत अवलंबण्याचा आधारे पात्र व्यक्तींना कुणबी जात प्रमाणपत्रे प्रदान.

- जात प्रमाणपत्रासाठी एकूण ४८ पुरावे ग्राह्य धरणार. या दुरुस्त्यांचा इतर समाजाला देखील फायदा.

**सामाजिक न्याय विभाग अधिसूचना** सीबीसी १०/२०१७/प्र.क्र. ५०/मावक २४/११/२०१७ व सीबीसी १०/प्र.क्र. २१९/मावक २८/२/२०१८ आणि सीबीसी २०२३/प्र.क्र. १८२/मावक २७/१२/२०२३ व १८/७/२०२४

www.marathamahasangh.org

https://mahadbt.maharashtra.gov.in



# अण्णासाहेब पाटील महामंडळाची निर्मिती

- सन १९९७ मध्ये अखिल भारतीय मराठा महासंघाचे तत्कालीन अध्यक्ष कै. किसनराव वरखिंडे, सरचिटणीस कै. सुरेश माने यांचे शिष्टमंडळ शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना भेटले.

- त्यांनी अशी मागणी केली की अनेक जाती धर्मासाठी शासनाची महामंडळे आहेत परंतु आर्थिक दुर्बल घटकासाठी असे महामंडळ नाही ते आर्थिक निकषावरच्या आरक्षणाची पहिली मागणी करणारे कै. अण्णासाहेब पाटील महामंडळ यांच्या नावाने असावे अशी मागणी केली.

- त्यांनी तत्काळ संमती दर्शवून तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी महोदयांना फोन करुन घोषणा करायला लावली. त्यानंतर १७ महिन्यात सर्व प्रक्रिया पूर्ण करुन सन १९९८ मध्ये हे महामंडळ अस्तित्वात आले. २०१७ पर्यंत या महामंडळांना फारशी गती मिळाली नाही. मराठा क्रांती मोर्चा नंतर महामंडळांच्या योजनेमध्ये बदल करून **कर्ज तुम्ही घ्या, व्याज सरकार भरेल** अशी योजना आणली.

- त्यामुळे आत्तापर्यंत १,०३,७३९ युवकांना बँकामार्फत ८,६०० कोटींचे कर्ज व या महामंडळामार्फत ८७२ कोटीं व्याज परतावा देण्यात आला. मराठा उद्योजकतेला यामुळे चालना मिळाली.

www.marathamahasangh.org

# सारथी संस्था निर्मिती अहवाल

- आरक्षण देणारा समाज आरक्षण मागण्याच्या अवस्थेपर्यंत काळाच्या ओघात मागे पडलेल्या पारंपरिक शिक्षण घेतलेल्या मराठा युवक युवतींना पुढारलेल्या जगात संधी मिळावी यासाठी शासनाच्या संस्थात्मक पाठिंब्याची गरज होती.

- म्हणून बार्टीच्या धर्तीवर छत्रपती शाहू महाराजांच्या नावाने सुरु असलेल्या छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) संस्थेची निर्मिती मराठा क्रांती मोर्चाच्या मुळे तत्कालीन शासनाने सन २०१८ मध्ये केली.

- तिच्या निर्मितीसाठी शिफारस करण्यासाठी नेमलेल्या डॉ. सदानंद मोरे समितीचा अहवाल तयार करताना या समितीस राजेंद्र कोंढरे अखिल भारतीय मराठा महासंघ यांनी विविध क्षेत्रातील शिक्षण उद्योग कृषी रोजगार इ. क्षेत्रातील तज्ज्ञांचे कडून रिपोर्ट्स, सांखिकी माहिती, कार्यशाळा अनेकविध प्रकारे सहकार्य केले.

- आज सारथी संस्थेमार्फत पासून ते उच्च शिक्षणाच्या अनेकविध प्रकारच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. राज्यातील मराठा शिक्षण संस्थानी देखील सारथीच्या धर्तीवर काम केले पाहिजे. याक्षेत्रामध्ये मराठा व मराठा कुणबीचे प्रमाण अत्यल्प आहे. अशा विविध क्षेत्रात जाण्यासाठी सारथी ची मदत होत आहे.




# शिक्षक भरतीत न्याय - बिंदू नामावली घोटाळा

- सन २०१७ च्या शिक्षक भरती मध्ये खुल्या प्रवर्गास केवळ १३२ जागा तर EWS प्रवर्गास १९९ फक्त एवढ्या जागा आल्या होत्या.

- शिक्षक भरतीत न्याय - महाराष्ट्रामधील चालू शिक्षक भरतीमध्ये पहिल्या टप्प्यात एकूण भरल्या जाणाऱ्या २१,६७८ पदांपैकी जिल्हा परिषद आस्थापना, महापालिका, नगरपालिका, खाजगी संस्था मिळून खुल्या प्रवर्गाला ६१७० तसेच EWS प्रवर्गाला २३२४ जागा भरतीसाठी आल्या.

- ही प्रचंड मोठी तफावत अखिल भारतीय मराठा महासंघ 'शिवप्रहार मराठा युवा सेना' या संघटनांनी बिंदू नामावली तपासणीमध्ये मोलाची कामगिरी बजावली. राज्यातील सर्व जिल्हापरिषदा, महापालिका, विभागीय मागासवर्ग कक्ष व मंत्रालय येथे पाठपुरावा करण्यात आला.

- यामुळेच सध्या चालू शिक्षक भरती मध्ये एकूण ८४९४ खुल्या व EWS विद्यार्थ्यांना नोकरीचा लाभ मिळणार आहे. यापैकी **सुमारे ४२०० जणांना महापालिका व जिल्हा परिषद यांच्या सेवेत सामावून घेतले गेले आहे.** संघटनेच्या आजवरच्या कामातील अधोरेखित करण्यासारखे एक महत्त्वाचे आणि मोठं यश आहे.



www.marathamahasangh.org




**ह्या व यापुढे अशा अनेक मान्यवरांचे विचार कायम ऐकण्यासाठी स्कॅन करा व www.marathamahasangh.org या संकेत स्थळाशी कनेक्ट रहा. तसेच ही पुस्तिका मिळाल्याबद्दल आपल्या नावाची नोंदणी करा**



## अखिल भारतीय मराठा महासंघ

संपर्क कार्यालय : रायरेश्वर "जी" ब्लॉक,
1358 सदाशिव पेठ, बाजीराव रोड, पुणे – 411030

कार्यालय नं.: 5 नवलकर लेन, गिरगाव, मुंबई

संपर्क: +91 88 73 500 500

ईमेल आयडी: marathamahasangh1981@gmail.com

वेबसाईट: www.marathamahasangh.org


## स्कॅन करा व मराठा महासंघाच्या परिवारात सहभागी व्हा!